REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून व्यक्त होणारे 'लोकसंस्कृती उपासक'

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे,पुणे.

**सारांश—**
संत तुकाराम महाराज जनसामांन्या मध्ये राहून त्यांच्या जीवनाला न्याहाळणारे संत होते. जनसामांन्यांना अध्यात्मिक जीवनाची ओळख करून देणारे मार्गदर्शक होते. त्यांची अभंगगाथा या अर्थाने आजही मार्गदर्शक आहे.



**प्रस्तावना—**
समाजामध्ये लोकसंस्कृती जपणारे विविध जातीसमुहाचे लोक वावरत असतात. हे लोकसंस्कृतीचे उपासक खऱ्या अर्थाने लोकसंस्कृती जपत असतात. लोकांच्या मनात अनेक प्रकारच्या श्रद्धा घर करून असतात. अनेक प्रकारच्या रूढी, परंपरा, सण — उत्सव साजरे होत असतात. श्रमजीवी माणसाला आपल्या जगण्यामध्ये स्थिरता आणि निर्धोकपणा आवश्यक असतो. हा निर्धोकपणा ते मिळवण्याचा प्रयत्न करीत असतात. मनोरंजन, प्रबोधन आणि या प्रकारचे मानसिक स्थैर्य हे लोकसंस्कृतीचे उपासक जनमाणसांना सढळ हाताने देत असतात, म्हणून त्यांचे आणि समाजाचे एक अतूट नाते राहिलेले आहे.

हे लोकसंस्कृतीचे उपासक वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. संस्कृतीच्या प्रवाहाने त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. त्यांचे काम, सेवाभाव आणि अध्यात्माशी त्यांची असणारी नाळ यांचा एकत्रित उपयोग तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमध्ये करून घेतलेला दिसतो.

## तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेतून उल्लेख केले गेलेले 'लोकसंस्कृतीचे उपासक'—

संत तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेमधून वेगवेगळ्या लोकसंस्कृती उपासकांचे उल्लेख आले आहेत. यामध्ये पुढील लोकसंस्कृती उपासकांचा समावेश आहे.1) पांगुळ 2) तराळ 3) सरोदे 4) वासुदेव 5) नंदिबैलवाला 6) वाघ्यामुरळी 7) गोंधळी 8) गारूडी 9) कोल्हाटी 10) बहुरूपी यांचा समावेश आहे.

विशिष्ट धर्माशी किंवा विचारधारेशी संबंधितही लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. यामध्ये—

1) जंगम 2) मुंढा 3) फकीर 4) मलंग 5)मानभाव 6)जोशी 7) दरवेशी यांचाही समावेश आहे.हे सर्व लोकसंस्कृतीचे उपासक आहेत.

लोकसंस्कृतीच्या मुळाशी विविध गोष्टी असतात. ''लोकजीवन आणि लोकसंस्कृती समजावून घेताना आपल्या पूर्वजांच्या जगण्याची रीत कशी होती हे पाहणे ही महत्त्वाचे ठरते. आपले पूर्वज कोणत्या श्रद्धा घेऊन जगत होते? कोणती मूल्ये आणि श्रद्धा त्यांनी स्वीकारल्या होत्या, हे पाहणेही महत्त्वाचे आहे.''[1] या दृष्टीने तुकाराम महाराजांनी लिहिलेल्या या विषयासंदर्भातल्या अभंगांचा विचार करावा लागतो. लोकसमुहाला जीवन जगण्याची उर्जा, मनोरंजनातून प्रबोधन करण्याचे स्वरूप आणि अध्यात्माकडे वाटचाल होण्यासाठी मनाची मशागत तुकाराम महाराज कशी करत होते, ते या विशिष्ट अभंगांमधून स्पष्ट होते काय? याचा शोध घेणे आवश्यक ठरते.

लोकसंस्कृतीचे उपासक हे या अर्थाने समाजसेवक आहेत. सामाजिक स्वास्थ जपण्यासाठी ते झटत असतात. खरे तर त्यांचे हे जगणे समाजासाठी असते आणि समाजावर अवलंबून असते. समाज त्यांच्या या कार्याच्या मोबदल्यात त्यांचे पोट भरतो. या लोकसंस्कृतीच्या उपासकांचा, त्यांच्या कार्याचा उपयोग संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमधून केला आहे.

## संत तुकाराम महाराजांच्या अभगांमधून व्यक्त होणारे लोकसंस्कृतीचे उपासक त्यांची शिकवण आणि अध्यात्मक विचार–

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमधून वेगवेगळया लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या अनुषंगाने अध्यात्मिक विचार मांडले आहेत. त्यांची शिकवण आणि उपदेश यावर दृष्टिक्षेप टाकला आहे.

'पांगुळ' या लोकसंस्कृती उपसकाचे गाऱ्हाणे संत तुकाराम महाराज असे मांडतात–

''पांगुळ जालो देवा नाही हात ना पाय।
बैसलो जयावरी सैराट ते जाय।
खेटिता कुंप कांटी। खुंद दरडी न पाहे।
आधार नाही मज कोणी। बाप ना मा ये।।1।।
दाते हो दान करा। जातें पंढरपुरा''[2]

'पांगुळ' हा भल्या पहाटे गावात येतो. झाडाच्या उंच शेंड्यावर चढतो. गाणी गातो, आळवणी करतो. आपल्या पदरात जे पडेल ते स्वीकारतो. गावाचे भले पाहतो. उत्तम भविष्यवाणी करतो. ज्यांना कुणी 'आपले' नाही त्यांचा आधार परमेश्वर आहे असा आश्वासक विचार तो लोकांना देतो.

'तराळ' यांच्याकडे गावाचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपविलेली होती. गावाच्या वेशीभोवती रात्रभर पहारा देण्याचे काम त्याला करावे लागायचे. नवीन माणसावर लक्ष देण्याची जबाबदारी त्याचीच असायची. या तराळाच्या अनुषंगाने तुकाराम महाराजांनी समाजाला उपदेश केला आहे.

''जागा घरटी फिरे तस्कराची दिवसाराती
नीदसुरें नाडिली असो ऐसीं मागे किती।।1।।
हाट करी सकळ जन।
हुषार ठायी। निजनिजेलिया पाहीं।।2।।
सावचित्त असे खरा।
लाभ घेऊन जाये घरा।।3।।
तराळ बोंबे उनराई।
राखा आपुलिया भाई।।4।।
हरिच्या नाभीं घालूं जागा।
तुका म्हणे हुशार गा ।।5।।''[3]

संसार करताना जीवनावश्यक गोष्टी जपाव्या लागतात, त्यांचे रक्षण करावे लागते. बाजारातून आणलेल्या सर्व वस्तू जपून आणाव्या लागतात, त्यांचा सुयोग्य उपयोग करावा लागतो. तराळ जसा बोंब मारून गावाला जागसूद ठेवतो त्याप्रमाणे या संसारातून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी आपणही जागृत राहण्याची गरज असते. हरिनामाच्या स्मरणाने ही जागृती येत असते. ही हुषारी सामान्य माणसांनी दाखवावी असा उपदेश संत तुकाराम महाराज 'तराळ'च्या आधारे करतात.

'सरोदा' हा लोकांचे भविष्य सांगणरा आहे. हे सरोदे पूर्वी राजेमहाराजांचे भविष्य सांगायचे. समाजामध्ये जे शकून अपशकून असतात त्याविषयीही लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम 'सरोदा' करीत असतो. लोकांचे भवितव्य या सरोदाच्या भविष्यकथनाशी जोडलेले असते. अशा भविष्यकथनातून हा सरोदा आपली उपजिविका करतो. उपदेश करताना तो म्हणतो–

''आणीक ऐका गा ए।
सरवदा सांगतो काय।
खरें चि बोले तो जाय।
नरकामध्ये अधोगती। हे नरनारी।।
आणीक नाडेल एक जाण।
सरवदा बोलतो वचन।
जागे माझे म्हणेन।
पडिले खान तया घरी।
म्हणोन न म्हणा माझें काही।।''[4]

वागणे कसे असावे? कसे नसावे? याविषयी 'सरवदा' उपदेश करतो आहे. संतांनी सरळ उपदेश केला तर माणसे नेमके त्याच्या उलट वागतात, मग उलट उपदेश केला तर माणसांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे सरळ वागावे म्हणून सरवदा असा उपदेश करत आहे. संसारात 'माझे माझे' म्हणणारा शेवटी पश्चातापच पदरात पाडून घेतो, ही सरवदयाची भविष्यवाणी हे त्रिकालाबाधित सत्य आहे. त्यामुळे तृष्णाविरहीत जीवन जगणे हेच आनंदाचे जगणे आहे असा उपदेश 'सरवदा' करतो.

भल्या पहाटे गावाला जागे करणारा लोकसंस्कृतीचा उपासक म्हणजे वासुदेव गळ्यात कवड्यांच्या माळा, डोक्यावर मोराच्या पिसांची टोपी अशा वेशातला वासुदेव लोकांना सुपरिचित आहे. परमेश्वराची आळवणी करत, संसाराच्या भुलभुलैयापासून जागे करणारा हा कलावंत. त्याच्या या हुन्नरीचा उपयोग संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगामधून करून घेतला आहे.

''राम राम दोनी अक्षरें।
सुलभ आणि सोपारें।
जागा मागिले पाहारें।
सेवटिचें गोड तें चि खरे गा।।1।।
रामकृष्ण वासुदेव।
जाणवी जनासी।
वाजवी चिपळिया। टाळ घागऱ्याघोषें गा।।
गाय वासुदेव वासुदेवा।
भिन्न नाही आणिक नावा।
दान जाणोनिया करी आवा।
न ठेंवी उरी काही ठेवा गा।।2।।''[5]

राम नामाचा सोपा जप तारून नेणारा आहे. म्हणून हाच सोपा उपाय करून संसाराच्या मोहातून सुलभपणे बाहेर पडावे असा उपदेश वासुदेव करतो. प्राणीमात्रामध्ये त्या परमेश्वराचे अस्तित्व आहे, हे कधी विसरू नये. त्यांची नावे भिन्न असली तरी परमेश्वरांचा अंश सगळीकडे समान आहे. हे सत्य सांगितल्याबद्दल आता मला दान द्यावे असे आर्जव वासुदेव करतो.

नंदिबैल घेऊन फिरणारा नंदिबैलवालाही गावोगाव फिरणारा एक लोकसंस्कृती उपासक आहे. नंदिबैलाकरवी तो भविष्यकथन करतो आणि लोकांकडे धान्य आणि पैसा मागतो. माणसाने शिकवलेल्या बैलाप्रमाणे वागू–बोलू नये असा उपदेश संत तुकारामांनी या निमित्ताने केला आहे. अभंग क्र. 4274 मध्ये याचा उल्लेख संत तुकारामांनी केला आहे.

'वाघ्यामुरळी' हे जागते आणि जोगतीनी म्हणून परिचित आहेत. यल्लमादेवीच्या नावाने तर कधी विविध देव–देवतांची नावे घेऊन ते मनोरंजन करीत असतात. खंडोबाचेही ते भक्त असतात, घरामध्ये एखादे मंगलकार्य झाल्यानंतर 'आईचा गोंधळ' घातला जातो, ते काम 'वाघ्यामुरळी' करतात. गोंधळी जागर करतात, जागृती करतात तशीच जागृती तुकाराम महाराज करतात.

''माझा देव्हारा साचा।
नाही आणिक कोणाचा।
त्रिभुवनी याचा।
ठसा न लगे पुसावे।।1।।
या रे लोटांगणी।
काही करा विनवणी।
करीलझाडूणी।
भूत काढी संसार।।
पहिले विषयांचे गोंधळी।
ते त्रिगुण आकळी।
हरिनाम आरोळी।
कानी पडता ते उठी।।2।।''[6]

विषय वासना दूर करण्यासाठी अशा गोंधळ्याची, अशाच जागराची गरज पडत असते. सत्त्व, रज आणि तम गुणांना व्यवस्थित ओळखण्यासाठी हरिनामाची आवश्यकता असते. हरिनामाच्या आरोळीने, गोंधळाने चित्ताला जागृती प्राप्त होते. अध्यात्मामध्ये अशा गोंधळ्याची आणि अशा गोंधळाची नितांत गरज असते. हे तुकाराम महराजांनी दाखवून दिले आहे. यासाठी त्यांनी लोकसंस्कृतीचे उपासक, दैनंदिन घटना यांचा उपयोग केला आहे. त्यामुळे संतांचे उपदेश सामान्य माणसांना समजले. ''लोकांना खरा धर्मविचार सांगण्यासाठी, लोकांचा उद्धार करण्यासाठी संतसाहित्य निर्माण केले. त्यामुळे संत साहित्य संतांच्या विचाराच्या प्रसाराने साधन ठरले म्हणून सामान्यांना समजेल अशा मराठी भाषेत त्यांनी निर्मिती केली. रोजच्या जीवनातील बाबींचा उपयोग त्यांनी करून घेतला.''[7] म्हणून सर्वसामान्यांना या उपदेशातील मर्म समजले गाभा समजला.

गारुड करणारा तो गारुडी. गारुडी नाग–सापाचे खेळ करतो. पुंगी वाजवतो. खेळातून जणू तो संमोहन करतो. साप चावलेल्या माणसाला विष काढून बरे करतो. असा हा गारुडी. नागपंचमीचा सण आणि गारुडी यांचे नाते आहे. या सापाच्या खेळावरच गारुड्यांची उपजिविका चालत असते. त्याची ही उपजिविका हलक्या दर्जाची उपजिविका आहे असे तुकाराम महाराजांना वाटते. गारुडी सापाला आवाजाने नादावून सोडतो. त्याप्रमाणे आपली संसारात अवस्था झाली आहे असे संत तुकाराम महाराज सांगतात.

''सर्प भुलोन पडला नादा।
गारुडियें फांदां घातला से।
हिंडवुनि पोट भरी दारोदारी।
कोंडुनि पेटारी असे र या ।।1।।
तैसी परी मज जाली पांडुरंगा।
गुंतलो तो मी गा सोडी आता।
माझे मज न चलेंसे जालें
कृपा तुज न करिता।।''[8]

लोकसंस्कृतीतील या उपासकांचा, त्यांच्या कामाचा उपयोग संत तुकारामांनी आपल्या अभंगामधून केला आहे. कामरूपी विषबाधा होण्याची शक्यता असते, म्हणून साधव रहावे असा उपदेश ते करतात. आपली उपजिविका श्रेष्ठ असावी, अशी जागोजागी हात पसरण्याची वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून माणसांनी सावध रहावे असा उपदेश त्यांनी 'गारुडी' याचा आधार घेऊन केला आहे.

'कोल्हाटी' हा लोकसंस्कृतीचा उपासक. लवचिक शरीर आणि चपळता यांचा उपयोग करून कोल्हाटी विविध खेळ करून दाखवितात. उंच दोरी बांधून त्या दोरीवरून बांबूच्या आधारे चालणं हे अवघड काम असतं. असं कौशल्य डोंबारी दाखवतो असा खेळ करून दाखवतो. चार घटका करमणूक करतो आणि पोटाचं खळगं भरतो. हा उल्लेख संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात केला आहे तो असा–
''लटक्याचे आवतणे जेविलिया साच।

काय त्या विश्वास तो चिखरा।।1।।
ते काय पावत अमरपद।।''[9]

खोटी माणसं जेवणासाठी निमंत्रण देतात मात्र त्यांच्या त्या निमंत्रणावर विश्वास ठेवता येत नाही. जेवल्याशिवाय ते निमंत्रण खरं ठरत नाही. कोल्हाटी दोरीच्या सहाय्याने आकाशात झेप घेतो म्हणजे त्याला अमरत्त्व प्राप्त झाले आहे, असे म्हणता येत नाही. म्हणून सत्यासत्याची पारख करावी. वास्तव तपासावे म्हणजे मर्म समजते, असे संत तुकाराम महाराज सांगतात.

विशिष्ट धर्माची, विचारधारेशी किंवा परंपरेशी संबोधित लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. त्यांनी समाजाला वैचारिकदृष्ट्या जागृत केले आहे. त्यांचा विचार तुकाराम महाराजांनी असा मांडला आहे–

'जंगम' या लोकसंस्कृतीच्या उपासकाचा दंभस्फोट करतांना ते म्हणतात–

''होऊनी जंगम विभूती लाविती।
शंख वाजविती घरोघरी।।1।।
शिवाचे निर्माल्य तीर्थां न सेविती।
घंटा वाजविती पोटासाठी।
तुका म्हणे त्यासी नाही शिवभक्ती।
व्यापार करिती संसाराचा।।3।।''[10]

अंगाला विभुती फासून, दारोदारी शंख वाजवल्याने भक्त होत नाही. हे जंगम शिवाची पूजा करीत नाहीत, केवळ नाव घेतात. दारोदारी घंटा वाजवितात आणि पोटासाठी काही मागत राहतात. अशा प्रकारचे त्यांचे जगणे आहे, त्यांचा संसार आहे. हे त्यांचे जगणे योग्य नाही याची जाणीव ते सर्वांना करून देतात. या वर्णनावरून लक्षात येते की संत तुकाराम महाराज दांभिकतेवर प्रहार करतात. समाजातील सर्वच घटक सचोटीने वागतात असे नाही. जेव्हा ही दांभिकता व्यक्त होते, तेव्हा समाजाला त्यापासून सावध करणे आवश्यक असते. याची जाणीव त्यांनी करून दिली आहे.

'मुंडा' हे मुस्लिम समाजाचे असतात. ते गुरूसमाजन असतात. पृथ्वीवरील सर्व माणसे एकाच परमेश्वराने निर्माण केली आहेत असा विचार ते व्यक्त करतात. त्यामुळे भेदाभेद करणे, असमानता पाळणे त्यांना मान्य नाही. 'मुंडा' च्या आधारे तुकाराम महाराजांनी निसर्गानुसार दिल्या गेलेल्या मूलभूत समानतेचा विचार मांडला आहे. सर्वजण एकाच ईश्वराची लेकरं आहेत, हा विचार रूजविण्याचा प्रयत्न तुकाराम महाराज करताना दिसतात.

'फकीर', 'मलंग' हे ही परमेश्वराच्या नावावर जगतात. गावोगावी फिरणारे फकीर लोकांसाठी दुवा करतात, प्रार्थना करतात. अल्लाच्या नावावर काहीही मागतात, आणि जीवन जगतात. मलंगही त्यातलेच. त्यांचाच रूपकात्मक उपयोग आपल्या अभंगामध्ये संत तुकारामांनी केला आहे.

''नजर करे सो हि जिंके
बाबा दुरथी तमासा देख।
लकडी फासा लेकर बैठा आगले ठकण भेख।।1।।
काहे भुला एक देखत आखो
मार तंगाडो बाजार।।
दमटी चमडी जो नर भुला।
सोत आघोही लत खाये।।2।।
नहि बुलावत किसे बाबा
आप हि मज जाये।
कहे तुका उस असा के
संग फिरफिर गोदे खाये।।3।।''[11]

अशा भुलभुलैय्याला तुकाराम महाराज भुलू नका असा उपदेश करतात. वास्तवाला ओळखून, स्वप्नाच्या मोहजालातून बाहेर पडा अन्यथा अनर्थ अटळ आहे, असा इशारा ते देतात.

दरवेशी अस्वलाचा खेळ करतात. नकला करतात, आणि या मनोरंजनाच्या आधारे पैसा जमवतात. माणसांनी उत्तम करणी करून स्वतःचे जीवन उच्च करावे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

'जोगी' हे 'मानभाव' हे ही उपासक आहेत. उपासना करून ते चरितार्थ चालवितात. 'जोगी' यांची व्यवस्थित ओळख समाजाला आहे. योगी यांनाच जोगी असेही म्हटले जाते. या जोग्यांच्याही प्राचीन परंपरा आहेत. हे जोगी शंकराची आराधना करतात. जगाला सतत जागृत ठेवण्यासाठी ते प्रयत्न करतात असे म्हटले जाते. त्याविषयी या छोट्या अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात—

''जग जोगी जग जोगी।
जाग जागे बोलती।।1।।
जागता जगदेव।
राखा काही भाव।।
अवघा क्षेत्रपाळ।
पूजा सकळ।।2।।
पूजापत्र कांही।
फल पुष्प तोय।।3।।
बहुता दिसा फेरा।
आला या नगरा।।4।।
नका घेऊ भार।
धर्म तो चि सार।।5।।
तुका मागे दान।
दया जी अनन्य।।6।।''[12]

अशाप्रकारे पूजा करणारा जोगी अध्यात्माचे फळ मिळवून देतो. नगरी नगरी फिरतो. धर्माचे सार सांगतो. तुकाराम महाराजही या योग्याप्रमाणे फिरत आहेत. धर्माचे सार सांगत आहेत आणि भक्तीचे दान आपल्याला मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

अशा प्रकारे संत तुकाराम महाराजांनी या लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या आधारे अभंगांमधून साधा—सोपा उपदेश केला आहे. सामान्य माणसाचे जीवन साधे असते. त्याच्या मनात रूजलेल्या श्रद्धासुद्धा सामान्य असतात. आपल्या संसाराचा गाडा ओढून थकलेल्या माणसांना या दुःखापासून थोडाकाळ का होईना सुटका हवी असते. लोकसंस्कृतीचे हे उपासक या सामान्य माणसांचे संसारिक दुःख कमी करतात, हलके करतात. वास्तवाची जाणीव करून देतात. अध्यात्माची नवी जाणीव जागृती करून देतात. सामान्य माणसांना हे लोकसंस्कृतीचे उपासक, त्यांचा उपदेश सहज पचण्यासारखा असतो. अध्यात्मातील गुढ विचार किंवा स्वीकारण्यास कठीण वाटणाऱ्या गोष्टी या लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या आधारे सांगणे तुकारामांना सोपे वाटते. नेमक्या याच सोप्यापणाचा उपयोग त्यांनी करून घेतला आहे, आणि लोकांना अध्यात्मज्ञान देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगामधून हे लोकसंस्कृतीच्या उपासकांचे दुर्लक्षित जग समोर आले आहे. यानिमित्ताने संस्कृतीच्या प्रवाहात कार्यरत असणाऱ्या या समुहाची नवी ओळख समाजाला झाली आहे. संत तुकाराम महाराजांचे सामाजिक सामान्यत्व, दांडगे निरीक्षण आणि अध्यात्म सोपे करून सांगण्याची हातोटी या अभंगांमधून अधिक प्रभावीपणे व्यक्त झाली आहे, हे स्पष्ट होते.

## संदर्भ

1. फलके दत्तात्रेय, संत तुकाराम गाथेतील लोकमानस, सुप्रभा प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती 2015, पृ.170
2. लाड पुरुषोत्तम मंगेश (संपा.), तुकारामबाबांच्या अभंगांची गाथा (शासकीय प्रत) द्वितीय आवृत्ती 1955, पृ.75 अभंग क्र.423
3. उपरोक्त, पृ.677, अभंग क्र. 4146

4. उपरोक्त, पृ.80, अभंग क्र. 437
5. उपरोक्त, पृ.78 व 39, अभंग क्र. 432
6. उपरोक्त, पृ.73, अभंग क्र. 416
7. वाडकर धोंडिराम, नाथ संप्रदायाची परंपरा लोकसाहित्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती–2013, पृ.16
8. लाड पुरुषोत्तम मंगेश, उपरोक्त, पृ.194, अभंग क्र.1092
9. उपरोक्त, पृ.684, अभंग क्र. 4190
10. उपरोक्त, पृ.645, अभंग क्र. 3939
11. उपरोक्त, पृ.81–82, अभंग क्र. 442
12. उपरोक्त, पृ.80, अभंग क्र. 436